# PROFIT ADVERTISERS (INDIA) Pvt. Ltd.

| PRESS CLIPPING | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Client | Agrovision [1st Day] | | | | |
| Publication | Tarun Bharat | | | | |
| Language | Marathi | Place | Nagpur | Date | 12/11/16 |

# राज्यातील दुग्ध उत्पादन वाढीचे स्वप्न साकारणार

## ● ॲग्रो व्हिजन कृषी प्रदर्शनाच्या शुभारंभप्रसंगी मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन



दीपप्रज्वलनप्रसंगी देवेंद्र फडणवीस, नितीन गडकरी, सुधीर मुनगंटीवार, पांडुरंग फुंडकर, अजय संचेती, गिरीश गांधी, चंद्रशेखर बावनकुळे, डॉ. विकास महात्मे, रवींद्र बोरटकर, रमेश मानकर, निशा सावरकर

तभा वृत्तसेवा
नागपूर, ११ नोव्हेंबर

मागील दोन वर्षाच्या प्रयत्नानंतर राज्याच्या कृषी क्षेत्रात प्रथमतः मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्यात आली आहे. आता राज्यातील दुग्ध उत्पादन वाढीकडे लक्ष देऊन ते स्वप्न साकारणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मध्य भारतातील सर्वात मोठ्या ॲग्रो व्हिजन राष्ट्रीय कृषी प्रदर्शनाचे उद्‌घाटन आज सायंकाळी रेशीमबाग मैदानात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी केंद्रीय मंत्री व प्रदर्शनाचे प्रवर्तक नितीन गडकरी, अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार, हरयाणाचे कृषी मंत्री ओमप्रकाश धनकड, आसामचे कृषी मंत्री अतुल वोरा, राज्याचे कृषी मंत्री पांडुरंग फुंडकर, खा. कृपाल तुमाने, खा. विकास महात्मे, खा. अजय संचेती, दुग्धविकास मंत्री महादेव जानकर, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आ. मितेश भांगडिया, आ. अनिल सोले, ॲग्रो व्हिजनचे सल्लागार गिरीश गांधी, रवींद्र बोरटकर, माजी मंत्री सुलेखा कुंभारे, महापौर प्रवीण दटके, जि. प. अध्यक्षा निशा सावरकर, माजी आमदार आशीष जयस्वाल, महाबीजचे प्रबंध संचालक रामकृष्ण गमे, विभागीय आयुक्त अनुपकुमार, संजय धोत्रे व रमेश मानकर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी, राज्यात मागील काळात दूध्र उत्पादन माघारले. तत्कालीन राज्यकर्त्यांनी आपले दूध संघ मोठे केले. त्यामुळे त्याचा लाभ वैयक्तिक रीत्या झाला. पण या सर्व प्रकारात दुधाचा शासकीय ब्रांड मृतप्राय झाला. आता महादेव जानकर यांनी विशेष प्रयत्न करून शासनाचा आर्यशक्ती हा ब्रांड पुन्हा विकसित केला आहे. या माध्यमातून आता दूध उत्पादन वाढीकडे लक्ष देण्यात येईल असे आश्वासन दिले.

ॲग्रो व्हिजन प्रदर्शन हे आता भारताचे आकर्षण बनले आहे. शेतकऱ्यांपर्यंत नवे तंत्रज्ञान पोचावे यासाठी नितीन गडकरी सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांनी या क्षेत्रात सातत्याने नवनवे प्रयोग केले त्यामुळे गडकरींना आता कृषी वैज्ञानिक म्हणता येईल एवढे त्यांचे या क्षेत्रातील काम आहे. विदर्भाच्या कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान आणण्याचे काम नितीन गडकरी यांनी केले. येत्या काळात कृषी क्षेत्रातील उत्पादकता वाढविण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे लवकरच ५० हजार हेक्टरवर सेंद्रिय शेती सुरू करण्यात येईल असे सांगितले.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. तत्पूर्वी उपस्थितांपुढे शेतकरी नृत्य सादर करण्यात आले. या कार्यक्रमात ॲग्रो व्हिजन स्मरणिका, एक्झिबिटर डायरेक्टरी आदी प्रकाशनांचे विमोचन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. संचालन रेणुका देशकर यांनी, तर आभारप्रदर्शन रमेश मानकर यांनी केले. ■

### ॲग्रो व्हिजनचे कायमस्वरूपी कार्यालय राहणार : गडकरी

विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळावे यासाठी मागील ८ वर्षापासून ॲग्रो व्हिजन सुरू आहे. आता या प्रदर्शनाचे कायमस्वरूपी कार्यालय स्थापण्यात येणार आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांच्या गटाला नियमित मार्गदर्शन मिळेल अशी व्यवस्था करण्यात येत आहे. विदर्भात उस उत्पादन वाढले आहे. जलयुक्त शिवारमुळे पाणी उपलब्ध झाले आहे. याचा ५० लाख हेक्टरमधील शेतकऱ्यांना लाभ होईल. येत्या काळात विदर्भात कोळशापासून मिथेनॉल तसेच युरिया उत्पादन करण्यात येणार आहे. कृषी उत्पादन वाढविणे आणि खर्च कमी करणे यातून कृषी क्षेत्रात समृद्धी आणण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही केंद्रीय मंत्री व प्रदर्शनाचे प्रवर्तक नितीन गडकरी यांनी सांगितले. ■

### सोलर फीडरद्वारे दिवसा वीज

सध्या शेतकऱ्यांना अखंड वीजपुरवठा करण्यात येत आहे. पण येत्या काळात सोलर फीडरच्या माध्यमातून ४ हजार मेवॅ. वीज शेतकऱ्यांना उपलब्ध करून देईल व त्यातून दिवसा बारा तास वीज कृषी पंपांसाठी उपलब्ध होईल. या तंत्रज्ञान विकासासाठी जगभरातील १६ कंपन्यांना आमंत्रित करण्यात आले असून त्यातून निविदा काढण्यात येईल असेही फडणवीस यांनी यावेळी सांगितले. ■

महाऊर्जा : कार्यशाळेचे उद्‌घाटन, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रेल्वे मंत्री सुरेश प्रभू यांच्या प्रमुख उपस्थितीत, हॉटेल सेंटर पॉईंट, रामदासपेठ येथे सकाळी ९.३० वाजता.